५४ वा वार्षिक अहवाल
सन २०१४-१५




# दि बारामती सहकारी बँक मर्यादित

मुख्य कार्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२

ऑडिट वर्ग 'अ'

# श्री छत्रपती शिवाजी महाराज



निश्चयाचा महामेरू।
बहुत जनासी आधारू॥

प्रेरणास्थान

# मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार

अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा...



अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस



कणखर नेतृत्व व कुशल मार्गदर्शक

**मा. ना. श्री. अजितदादा पवार**

माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



बारामतीचे भूषण

**मा. खा. सौ. सुप्रिया सुळे**

# दि बारामती सहकारी बँक मर्यादित

## संचालक मंडळ

(सन २०१५ ते २०२०)



श्री. श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष



श्री. अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष



श्री. रमणिक रामजी मोता



श्री. सचिन सदाशिव सातव



ॲड. श्री. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी




श्री. देवेंद्र रामचंद्र शिर्के



श्री. दिग्विजय पोपटराव तुपे



श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर



श्री.आदेश अनिलकुमार वडुजकर



श्री.उध्दव सोपानराव गावडे



श्री.सुरेश गुलाबराव देवकाते



श्री.विजयराव प्रभाकर गालिंदे



श्री.कपिल राजेंद्र बोरावके



डॉ. वंदना उमेश पोतेकर



सौ. कल्पना प्रदिप शिंदे



श्री. प्रितम सुर्यकांत पहाडे
तज्ञ संचालक (सी.ए.)



श्री. श्रीनिवास गोपाळराव बहुळकर
कार्यकारी संचालक



श्री. श्रीकांत सिकची
अध्यक्ष

# दि बारामती सहकारी बँक मर्यादित

## संचालक मंडळ

(सन २००७ ते २०१५)



श्री. अविनाश भापकर
उपाध्यक्ष



श्री. पोपटराव तुपे



श्री. प्रकाशराव लालबिगे



श्री. रमणिक मोता



श्री. विलासराव जगताप



श्री. बाळासाहेब बोरकर



श्री. इंद्रजीत धुमाळ



श्री. राज मचाले



श्री. गणेश मुश्रीफ



श्री. सचिन सातव



श्री. राहूल नेवसे



सौ. सुनिता कोरटकर



सौ. छाया कदम



सौ. सारिका शहा (वडुजकर)



ॲड. श्री. सतिश सालपे
तज्ञ संचालक



श्री. प्रितम पहाडे
तज्ञ संचालक (C.A.)



प्र. ह. शर्मा
कार्यकारी संचालक
(३१.१२.२०१३ पर्यंत)



श्री. गो. बहुळकर
कार्यकारी संचालक
(०१.०१.२०१४ पासून)

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
## (फक्त सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १५ ऑगस्ट २०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन, भिगवण रोड, बारामती या ठिकाणी बोलविण्यात आली आहे. सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज घेण्यात येईल. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**❊ सभेपुढील विषय ❊**

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ०९ ऑगस्ट २०१४ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. दि. ३१ मार्च २०१५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रके वाचून मंजूर करणे.

३. सन २०१४-२०१५ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांष जाहीर करणे.

४. मा. सरकारी लेखापरिक्षक यांनी तपासणी केलेल्या सन २०१४-२०१५ सालच्या आर्थिक हिशोब तपासणी अहवालाची वाचून नोंद घेणे.

५. सन २०१५-२०१६ या वर्षासाठी बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.

६. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी सरकारी लेखापरिक्षक व स्थानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे बाबत विचार करणे.

७. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडे चालू आर्थिक वर्षात असलेल्या कर्जाची माहिती घेणे.

८. सन २०१५-२०१६ या आगामी आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक वाचून मंजूर करणे व मागील वर्षाच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे.

९. सदर वर्षात सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

१०. मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित विषयांचा विचार करणे.

दिनांक : २१ जुलै २०१५ — मा. संचालक मंडळाच्या अनुज्ञेनुसार

स्थळ : बारामती — श्री. गो. बहुळकर

कार्यकारी संचालक

## * विशेष सूचना *

१. ही सभा कोरम अभावी तहकूब करावी लागल्यास सभा अर्धा तास तहकूब केली जाईल व त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकूब झालेली सभा घेतली जाईल. त्यात वरील विषयांचा विचार केला जाईल.

२. सभासदांना वर नमूद विषया संबंधी काही विचारावयाचे असल्यास तसे त्यांनी दि. १२.०८.२०१५ अखेर पर्यंत बँकेत लेखी कळवावे. त्यांनतर आलेल्या पत्रांच्या विषयाचे अथवा शंकांचे निरसन करण्याचे बंधन बँकेवर असणार नाही.

३. सभासदांना देण्यात येणाऱ्या लाभांषाची रक्कम बँक सभासदांच्या बँकेतील सेव्हिंग्ज्/चालु किंवा अन्य खात्यात जमा देत असते. ज्या सभासदांचे खाते बँकेत नसेल त्यांनी त्वरित खाते उघडून या सेवेचा लाभ घ्यावा.

## दि. ३१ मार्च २०१५ अखेर शाखावार ठेवी, कर्जे व नफा या बाबतची माहिती

(₹ कोटीत )

| अनु . | शाखेचे नांव | ठेवी | कर्ज | नफा / तोटा |
|---|---|---|---|---|
| ०१ | बारामती शाखा | २१४.३५ | १४८.३३ | १.५३ |
| ०२ | इंदापूर शाखा | ८२.८२ | ५१.७९ | ०.६४ |
| ०३ | भिगवण शाखा | ३७.१० | १६.९५ | ०.३२ |
| ०४ | दौंड शाखा | ३५.३८ | ३३.९२ | ०.६२ |
| ०५ | चिंचवड शाखा | ८८.६२ | ८६.७१ | ०.६८ |
| ०६ | कोथरूड शाखा | ६०.३८ | २४.८८ | ०.२९ |
| ०७ | मार्केट यार्ड शाखा | ५५.७३ | ३३.२३ | ०.५९ |
| ०८ | निरा शाखा | ५०.२५ | १८.७३ | ०.२५ |
| ०९ | फलटण शाखा | २६.४६ | २५.२६ | ०.३४ |
| १० | करमाळा शाखा | ३२.०९ | १३.८७ | ०.१९ |
| ११ | बार्शी शाखा | ४१.५५ | ३३.१७ | ०.४० |
| १२ | पुणे - नगर रोड शाखा | ३३.६१ | २८.१७ | ०.३७ |
| १३ | लक्ष्मी रोड शाखा | २५.१६ | १६.५९ | ०.४२ |
| १४ | हडपसर शाखा | १९.६४ | १६.३१ | ०.०८ |
| १५ | सातारा शाखा | ४८.८५ | ३८.०७ | ०.५० |
| १६ | सोलापूर शाखा | २४.०४ | १४.८९ | ०.३९ |
| १७ | जळोची शाखा | ३६.०४ | ३६.६८ | ०.१४ |
| १८ | संगमनेर शाखा | ५३.२२ | २.३१ | ०.०२ |
| १९ | चाकण शाखा | १७.८९ | १०.३७ | -०.०६ |
| २० | शिरूर शाखा | १७.२० | १.८० | ०.०१ |
| २१ | अहमदनगर शाखा | १७.३५ | ७.३५ | -०.०३ |
| २२ | सांगवी शाखा | १२.८६ | ०.९३ | -०.०२ |
| २३ | भोसरी शाखा | ४.५३ | ०.२० | -०.०४ |
| २४ | मुख्यालय | - | - | १.६२ |
| | एकूण | १०३५.१२ | ६६०.५१ | ९.२५ |

## ✻ संचालक मंडळ ✻

श्री. श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष

श्री. अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष

श्री. श्रीनिवास गोपाळराव बहुळकर
कार्यकारी संचालक

श्री. रमणिक रामजी मोता

श्री. सचिन सदाशिव सातव

ॲड. श्री. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी

श्री. देवेंद्र रामचंद्र शिर्के

श्री. दिग्विजय पोपटराव तुपे

श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर

श्री. आदेश अनिलकुमार वडुजकर

श्री. उध्दव सोपानराव गावडे

श्री. सुरेश गुलाबराव देवकाते

श्री. विजयराव प्रभाकर गालिंदे

श्री. कपिल राजेंद्र बोरावके

डॉ. वंदना उमेश पोतेकर

सौ. कल्पना प्रदिप शिंदे

श्री. प्रितम सुर्यकांत पहाडे
तज्ञ संचालक (सी.ए.)

## बँकर्स

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई

दि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., पुणे

स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा बारामती

एच.डी.एफ.सी. बँक, पुणे

## मुख्यालय व शाखा संपर्क क्रमांक

| अ.क्र. | शाखेचे नांव | दुरध्वनी क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | मुख्यालय (स्वमालकीची वास्तु) | (०२११२) २२४८६५, २२४८४४ | ९९२२४४४१५० |
| ०२ | बारामती शाखा | (०२११२) २२४८६६, २२७७०४ | ९९२२४४४१५१ |
| ०३ | इंदापूर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१११) २२३२७७, २२४७६६ | ९९२२४४४१५३ |
| ०४ | भिगवण शाखा | (०२११८) २४६२०५ | ९९२२४४४१५४ |
| ०५ | दौंड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११७) २६४४७७, २६४९५९ | ९९२२४४४१५५ |
| ०६ | चिंचवड शाखा | (०२०) २७४५०११०, २७३५४८२६ | ९९२२४४४१५६ |
| ०७ | कोथरूड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२०) २५३९५२०० | ९९२२४४४१५७ |
| ०८ | मार्केट यार्ड शाखा | (०२०) २४३६०९६६, २४३७५२१७ | ९९२२४४४१५८ |
| ०९ | निरा शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११५) २४२४७७ | ९९२२४४४१५९ |
| १० | फलटण शाखा | (०२१६६) २२२७७७ | ९९२२४४४१६१ |
| ११ | करमाळा शाखा | (०२१८२) २२०९७७ | ९९२२४४४१६० |
| १२ | बार्शी शाखा | (०२१८४) २२२०८९ | ९९२२४४४१६२ |
| १३ | पुणे-नगर रोड शाखा | (०२०) २७०११९४२, २७०११९३७ | ९९२२४४४१६३ |
| १४ | लक्ष्मी रोड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२०) २४४५५५१७ | ९९२२४४४१६४ |
| १५ | हडपसर शाखा | (०२०) २६९८१८६६ | ८३८०००४२९२ |
| १६ | सातारा शाखा | (०२१६२) २३७९४०, २३७९५५ | ९९२२४४४१६५ |
| १७ | सोलापूर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१७) २७२९२६६, २७२९२७७ | ९९२२४४४१६६ |
| १८ | जळोची शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११२) २२४८६५, २२४८४४ | ९८५०८९४५४९ |
| १९ | संगमनेर शाखा | (०२४२५) २२७६६६, २२२७०१ | ८३८०००४२९४ |
| २० | चाकण शाखा | (०२१३५) २४९११२ | ८३८०००४२९५ |
| २१ | शिरूर शाखा | (०२१३८) २२२२६६ | ८३८०००४२९७ |
| २२ | अहमदनगर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२४१) २३२७७०१ | ८३८०००४२९६ |
| २३ | सांगवी शाखा | (०२०) २७२०३०८८ | |
| २४ | भोसरी शाखा | (०२०) २७११००१६ | |
| २५ | सिंहगड रोड, पुणे (नियोजीत) | | |



**श्रीकांत सिकची**
**अध्यक्ष**

## * सन २०१४-१५ चा ५४ वा अहवाल *

सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

आपल्या बँकेच्या ५४ व्या वार्षिक सभेच्या प्रसंगी मी आपणा सर्वांचे मा. संचालक मंडळाच्या वतीने मनापासुन हार्दिक स्वागत करतो व आपल्या उपस्थिती बद्द्ल मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफातोटा पत्रक सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

मी सर्वप्रथम आपणांस हे सांगू इच्छितो की, सन २०१४-१५ चा अहवाल मी जुन्या संचालक मंडळाच्या वतीने सादर करीत आहे. कारण बँकेच्या संचालक मंडळाची सन २०१५ ते २०२० या कालावधीसाठीची निवडणुक दि. ०९ मार्च २०१५ रोजी झालेली आहे. दि. ०३ एप्रिल २०१५ रोजी अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड होऊन नविन संचालक मंडळ अस्तित्वात आलेले आहे. मा. आ. श्री. अजितदादा पवार माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शन लाभलेल्या विद्यमान संचालक मंडळास आपण सर्वांनी प्रचंड मताधिक्य मिळून दिले याबद्दल सुरूवातीस मी आपल्या सर्वांचे संचालक मंडळाचे वतीने आभार मानतो.

मागील वर्षी कमी झालेली पर्जन्यवृष्टी व नंतर झालेल्या गारपीटीचा परिणाम व्यापार उद्योग, शेती व शेतीपुरक व्यवसाय या सर्वांवर झाला. त्यामुळे सर्वच बँकांना आर्थिक वर्ष खूपच आव्हानात्मक गेले. अशा प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या सर्वांचा बँकेवरील दृढ निश्चय व सदिच्छा तसेच मा. आ. श्री. अजितदादा पवार माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शनामुळे आपल्या बँकेच्या ठेवी, कर्जे व नफा या क्षेत्रात चांगली वाढ झाली आहे. परंतु ही वाढ मागील वर्षीपेक्षा कमी झाली आहे. याचा अंदाज मागील वर्षीच्या अहवालात आपण नमूद केला होता. तरीही आपल्या बँकेस प्रगतीमध्ये सातत्य राखण्यात यश मिळाले आहे.

अहवाल सालाचे सुरूवातीस आपल्या बँकेच्या ठेवी ₹९२१.६५ कोटी इतक्या होत्या दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर ठेवी ₹१०३५.११ कोटी इतक्या झालेल्या आहेत. ठेवींमध्ये ही वाढ सुमारे ₹११३.४६ कोटी इतकी झालेली आहे. आपल्या सर्वांचा बँकेवरील अढळ विश्वास व सेवकांकडून ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या अत्याधुनिक सेवा व सुविधा यामुळे ही वाढ झालेली आहे. सदरची वाढ शे. १२.३१ टक्के आहे. पुणे विभागातील बँकांमधील ही वाढ सरासरी शे. ९ टक्के इतकी राहीली आहे.

दिनांक ३१ मार्च २०१४ अखेर कर्जवाटप ₹५८९.५९ कोटी इतके होते. अहवाल सालात कर्जवाटपामध्ये ₹७०.९२ कोटी वाढ होऊन अहवाल वर्षा अखेर कर्जवाटप ₹६६०.५१ कोटी इतके झाले आहे.

दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर बँकेचा ढोबळ नफा ₹१५.४२ कोटी इतका आहे. आयकर व इतर कायदेशीर तरतुदी वजा जाता बँकेस निव्वळ नफा ₹९.२५ कोटी इतका झाला आहे.

बँकेच्या वसुल भागभांडवलात ₹२.३६ कोटींनी वाढ होऊन वर्षअखेर वसुल भागभांडवल ₹२१.०३ कोटी झाले आहे. भांडवल पर्याप्तता (CRAR) प्रमाण शे. १३.२८ इतके झालेले आहे. सदरचे प्रमाण भारतीय रिझर्व बँकेच्या निकषापेक्षा जास्त आहे.

आपल्या बँकेने तळेगांव, हिंजवडी, शिरवळ, काष्टी, टेंभुर्णी,

श्रीरामपूर, पनवेल, सिन्नर, याठिकाणी शाखा उघडणेसाठी परवानगी मिळणेसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव दाखल केला असून लवकरच त्यास मंजूरी मिळेल अशी खात्री आहे. त्यामुळे नजिकच्या काळात शाखांची संख्या ३२ वर जाणार आहे.

अहवाल सालात कमी झालेला पाऊस, त्यानंतर झालेली गारपीट तसेच औद्योगिक क्षेत्रातील मंदी इत्यादीचा परिणाम वसुलीवर झालेला आहे. या परिस्थितीत कर्जदारांना दिलासा मिळावा म्हणून बँकेने वसुलीचे धोरण फार कडक ठेवले नव्हते. त्यामुळे एन.पी.ए. चे प्रमाण थोडे वाढलेले दिसत आहे. मागील अहवाल सालात ०.४६ टक्के इतके एन.पी.ए. चे प्रमाण होते ते ०.८० टक्के इतके झालेले आहे. चालु आर्थिक वर्षात वसुली चांगली होऊन हे प्रमाण कमी होईल अशी खात्री आहे.

आधुनिक बँकींग सेवेबरोबरच बँकेने यावर्षी सर्व शाखांमध्ये विज बिल भरणा केंद्र सुरू केले असुन त्यामुळे ग्राहक संख्या वाढण्यास मदत मिळणार आहे. त्याचप्रमाणे भारत सरकारने सुरू केलेल्या पंतप्रधान जिवन सुरक्षा विमा योजना व पंतप्रधान जिवन ज्योती योजनांची सुविधा आपल्या बँकेतील खातेदारांसाठी मिळवून दिली आहे. सर्व खातेदारांनी व सभासदांनी या योजनेत सहभागी व्हावे अशी मी विनंती करतो.

वरील विमा योजना व्यतिरिक्त बँकेने जनरल इन्शुरन्स व जिवन विमा योजना यांची कॉर्पोरेट एजन्सी घेतली असून त्याचाही लाभ बँकेस होत आहे. तसेच आधुनिक सर्व सेवा सुविधा ग्राहकांना आपल्याच बँकेत मिळणेसाठी एस.एम.एस. बँकींग या सेवाही सुरू केल्या आहेत.

मागील अहवाल सालात बँकेच्या ठेवी ₹१००० कोटी करण्याचे उद्दिष्ठ आपण ठेवलेले होते. ते उद्दिष्ठ आपल्या सर्वांच्या सहकार्याने बँकेने पार केले असून दि. ३१ मार्च २०१५ अखेर ठेवी ₹१०३५ कोटी झालेल्या आहेत. तसेच बँकेच्या कोथरूड, इंदापुर व अहमदनगर या शाखा स्वमालकीच्या जागेत स्थलांतरीत झालेल्या आहेत, सांगवी व भोसरी या नविन शाखा अहवाल सालात सुरू झालेल्या आहेत, त्यामुळे शाखांची संख्या २३ झालेली आहे.

सभासदांच्या दृष्टीने महत्वाची बाब म्हणजे केंद्र सरकारने चालु अर्थसंकल्पात सहकारी बँकांच्या सभासदांना टी.डी.एस. लागु केलेला आहे. त्यामुळे सभासदांना पूर्वी मिळत असलेली टी.डी.एस. कपात न करण्याची सवलत रद्द झालेली आहे. सभासदांनी यासाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधुन १५ एच व १५ जी फॉर्म भरून दयावेत. तसेच पॅनकार्डची कॉपीही शाखेत दाखल करावी अन्यथा २० टक्के टी. डी. एस. कपात होईल. याबाबत सर्व सभासदांना वेळोवेळी अवगत करण्यात आले आहे. तरी सभासदांनी याबाबत सहकार्य करावे ही विनंती.

आगामी काळात बँकेच्या ठेवी ₹१२०० कोटी पर्यंत वाढविणे तसेच बँकेस शेडयुल्ड दर्जा मिळविणे या महत्वाच्या गोष्टी करावयाच्या आहेत. तसेच लवकरच मोबाईल बँकींग व इंटरनेट बँकींगची सेवा देखिल ग्राहकांना उपलब्ध करून देणार आहोत. रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे कडून मोबाईल बँकींगची परवानगी आपल्या बँकेस नुकतीच प्राप्त झालेली आहे. ही एक आपल्या सर्वांच्या दृष्टीने अतिशय आनंदाची बाब आहे.

अहवाल सालात मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवारसो, मा.आ. श्री.अजितदादा पवारसो माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. खा. सौ. सुप्रियाताई सुळे, मा.सौ. सुनेत्राताई पवार, अध्यक्षा बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क यांनी व आपण सर्वांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्य यामुळेच बँकेचा विकास व प्रगती होत आहे. तसेच बँकेचे उपाध्यक्ष, संचालक मंडळातील सर्व आजी व माजी सदस्य, मुख्यालयातील अधिकारी, शाखांचे शाखाधिकारी, सर्व सेवकवर्ग व सभासद बंधु भगिनी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले याबद्दल मी सर्वांचे मन:पासुन आभार व्यक्त करतो.

आपल्या सर्वांच्या संमतीने आपणास अहवाल सादर करीत असून त्यास आपण मंजुरी प्रदान करावी ही विनंती.

कळावे,

आपला कृपाभिलाषी,

**श्रीकांत सिकची**
**अध्यक्ष**

# * सन २०१४-१५ चा ५४ वा अहवाल *

### सभासद

अहवाल वर्षीच्या सुरूवातीस एकुण सभासद संख्या १३९४६ इतकी होती. अहवाल वर्षात नव्याने ५४९ सभासद झाले आहेत. कर्ज व्यवहार पूर्तता व इतर कारणांमुळे १९० सभासद कमी झाले आहेत. त्यामुळे अहवाल वर्ष अखेर एकुण सभासद संख्या १४३०५ इतकी आहे.

### भागभांडवल

दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर बँकेचे भागभांडवल ₹२१.०३ कोटी इतके झाले आहे. गतवर्षी ते ₹१८.६७ कोटी इतके होते. अहवाल वर्षात भागभांडवलात ₹२.३६ कोटींची वाढ झालेली आहे. ही वाढ शे.१२.६४ टक्के इतकी आहे.

### भांडवल पर्याप्तता

भागभांडवल पर्याप्ततेचे प्रमाण भारतीय रिझर्व बँकेच्या निकषानुसार किमान ९ टक्के असणे आवश्यक आहे. मार्च २०१५ अखेर आपल्या बँकेचे हे प्रमाणे शे. १३.२८ टक्के इतके आहे व ते आपल्या आर्थिक सुदृढतेचे द्योतक आहे.

### निधी

बँकेच्या आर्थिक सक्षमतेच्या निकषामध्ये स्वनिधी हा महत्वाचा घटक आहे. मागील अहवाल वर्षात बँकेचा स्वनिधी ₹४९.३२ कोटी इतका होता. अहवाल सालात त्यामध्ये ₹८.४० कोटींनी वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१५ अखेर एकुण निधी ₹५७.७२ कोटी इतका झाला आहे. यावरून आपल्या बँकेची आर्थिक स्थिती भक्कम होत असल्याचे दिसुन येते.

### ठेवी

अहवाल सालात बँकेच्या ठेवींमध्ये ₹११३.४६ कोटींनी वाढ होऊन एकुण ठेवी ₹१०३५.१२ कोटी इतक्या झालेल्या आहेत. गतवर्षी बँकेच्या ठेवी ₹९२१.६६ कोटी इतक्या होत्या. बँकेने ₹१००० कोटी ठेवींचा टप्पा पार केलेला आहे. याचे सर्व श्रेय आपल्या सर्व सभासदांना व ठेवीदारांना आहे. अहवाल सालात अनेक संस्था व सभासदांनी त्यांच्या ठेवी आपल्या बँकेत ठेवल्याने ही वाढ शक्य झाली आहे. सभासद व ठेवीदारांचा बँकेवरील दृढ विश्वास हेच ठेव वाढीचे मुख्य कारण आहे. संपूर्ण बँकींग इंडस्ट्रीमध्ये ठेव वाढीचे शे. ९ टक्के इतके असतानाही बँकेचे ठेव वाढीत शे. १२.३१ टक्क्यांनी वाढ झाली आहे हे उल्लेखनिय आहे. ठेवीदारांच्या ठेवींस संरक्षण मिळणेसाठी डिपॉझीट इन्शुरन्स व क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशन यांचेकडे भरावी लागणारी ठेवीच्या विम्याची रक्कम मुदतीत भरण्यात येते.

### कर्जे

मागील वर्षाअखेर बँकेचे एकुण कर्जवाटप ₹५८९.५९ कोटी इतके होते. अहवाल वर्षामध्ये बँकेच्या कर्जवाटपामध्ये ₹७०.९२ कोटी इतकी वाढ होऊन वर्षअखेर बँकेचे एकुण कर्जवाटप ₹६६०.५१ कोटी इतके झाले आहे. कर्जवाटप करताना गुणवत्ता राखण्याचा प्रयत्न केला जातो. लहान मोठे व्यावसायिक, छोटे उद्योजक, वैयक्तिक कर्जे यावर भर देण्यात आला आहे. अहवाल सालात औद्योगिक व व्यापारी क्षेत्रात मंदी असल्याने छोटी छोटी कर्जे देण्यावर भर देण्यात आला आहे. मार्च २०१५ अखेर बँकेचे कर्जवाटपाचे प्रमाण एकुण ठेवींच्या शे. ६३.८१ टक्के आहे. नविन कर्जदारांना कर्ज वाटप करताना भारतीय रिझर्व बँकचे कर्ज वितरणा साठीचे सर्व निकष पाळून कर्जवाटप केले जात आहे.

### अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रातील कर्जपुरवठा

भारतीय रिझर्व बँकेचे निकषानुसार समाजातील सर्व घटकांना बँकेने कर्ज पुरवठा केलेला आहे. अग्रक्रम क्षेत्रास कर्जाच्या शे. ६२.२९ कर्जपुरवठा केलेला आहे. त्यापैकी शे. २६.६३ टक्के इतका कर्जपुरवठा दुर्बल घटकांना केलेला आहे.

### थकबाकी / एन.पी.ए.

मागील वर्षी एन.पी.ए. चे प्रमाण शे. ०.४६ टक्के झाले होते. अहवाल सालात हे प्रमाण वाढलेले असून ते ०.८० टक्के

इतके झालेले आहे. अहवाल सालात आर्थिक मंदी, अस्थिर औद्योगिक वातावरण, शेतमालाचे पडलेले भाव तसेच रियल इस्टेट मधील मंदी या सर्वाचा परिणाम एन.पी.ए. वाढण्यात झालेला आहे. बँकेने सुध्दा कर्जदारांना अधिक तगादा न लावता त्यांना थकीत कर्ज भरणेसाठी आणखी मुदत देऊन कर्ज भरणेसाठी प्रोत्साहीत केले जात आहे. पुढील वर्षी हे प्रमाण कमी होईल यात शंका नाही.

### सेवक वर्ग

सेवकांना कामकाज करतांना बँकींग विषयक बदलांची वेळेवर माहिती मिळणेसाठी विविध संस्थांच्या प्रशिक्षणास पाठवून प्रशिक्षित केले जात आहे. अहवाल सालात व्यवस्थापन व कर्मचारी वर्ग यांनी एकमेकांत समन्वय साधुन बँकेच्या ठेवी, कर्जवाटप वाढविण्यात यश मिळविलेले आहे. बँकेच्या व्यवसाय वाढीसाठी संचालक मंडळ, बँकेचे सर्व अधिकारी व सर्व कर्मचारी एकजुटीने प्रयत्न करीत आहेत. कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक करुन त्यांना प्रोत्साहीत केले जाते.

बँकींगमधील वाढती स्पर्धा आंतराष्ट्रीय व देशांतर्गत आर्थिक बदल, ग्राहकांच्या बँकींगमधील वाढत्या अपेक्षा, रिझर्व बँक व केंद्र सरकारची धोरणे यामुळे बँकींग व्यवसाय करणे हे एक आव्हानच आहे. आपल्या बँकेची प्रगती पाहता आपले बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी वर्ग यांनी हे आव्हान उत्तमरित्या पेलले आहे असेच म्हणावे लागेल.

### लाभांष

सभासदांना त्यांचे भागावर शे. १२ टक्के लाभांष वितरीत करण्याची मा. संचालक मंडळाची शिफारस आहे. आपण त्यास मान्यता द्यावी ही विनंती.

### नफा वाटणी

दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर बँकेस ₹ ९२४८७८९७.०९ नफा झालेला आहे. मागील शिल्लक नफा ₹ १५३५६.४५ जमेस धरता एकुण नफा ₹ ९२५०३२५३.५४ वाटणीस उपलब्ध आहे.

सदर नफ्याची वाटणी पुढील प्रमाणे करावी अशी मा. संचालक मंडळाची शिफारस आहे आपण त्यास मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (₹) |
|---|---|---|
| १ | गंगाजळी (रिझर्व फंड) | ३,००,००,०००.०० |
| २ | लाभांष१२% | २,४६,००,०००.०० |
| ३ | इमारत निधी | ३,६०,००,०००.०० |
| ४ | शाखाविस्तार निधी | १०,००,०००.०० |
| ५ | लाभांष समिकरण निधी | ५,००,०००.०० |
| ६ | धर्मादाय निधी | २,००,०००.०० |
| ७ | आकस्मित निधी | १,५०,०००.०० |
| ८ | शिल्लक नफा | ५३२५३.५४ |
| | **एकूण** | **९२५०३२५३.५४** |

### मा. संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जे

मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना रिझर्व बँकेच्या निकषानुसार कर्ज वितरीत केलेले नाही. मात्र त्यांचे नातेवाईकांकडे असलेल्या मुदत कर्जाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

(रक्कम ₹ लाखात)

| अनु. | तपशिल | कर्ज प्रकार | वर्षाअखेरीस बाकी (₹) | थकबाकी (₹) |
|---|---|---|---|---|
| १ | संचालक | - | ०.०० | ०.०० |
| २ | नातेवाईक | मुदतीचे कर्ज | १५.९६ | १५.९६ |
| | **एकूण** | **-** | **१५.९६** | **१५.९६** |

### लेखापरिक्षण

दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर आर्थिक वर्षाचे सरकारी लेखापरिक्षण संगिता एस. अगरवाल ॲण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांनी पुर्ण केले असून त्यांचा लेखापरिक्षण अभिप्राय अहवालात प्रकाशित केलेला आहे. अहवाल वर्षात बँकेचा लेखापरिक्षण वर्ग 'अ' कायम राहीला आहे. ही आपण सर्व सभासदांना अभिमान वाटावी अशी घटना आहे.

### शाखाविस्तार

आपल्या बँकेने काष्टी (अहमदनगर), श्रीरामपूर (अहमदनगर), हिंजवडी (पुणे), तळेगांव (पुणे), टेंभुर्णी (सोलापूर), पनवेल (रायगड), शिरवळ (सातारा), सिन्नर (नाशिक) याठिकाणी शाखा उघडणेस परवानगी मिळणेसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव दाखल केला असून लवकरच त्यास मंजूरी मिळेल अशी खात्री आहे. वरीलपैकी पुढील वर्षात कमीत कमी ५ नवीन शाखा सुरू करण्यात येतील.

### आभार

बँकेच्या दैनंदिन विकास व प्रगतीसाठी वेळोवेळी ज्या व्यक्तिंचे, संस्थांचे सहकार्य मिळाले त्यांचे ऋणनिर्देशन करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. त्यामध्ये आपले आदरणीय लोकनेते मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, अध्यक्ष, राष्ट्रवादीकाँग्रेस, मा. आ.श्री. अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य), मा. खासदार सौ. सुप्रियाताई सुळे, मा. सौ. सुनेत्राताई पवार, अध्यक्षा, बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क, बारामती, मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील माजी सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. रामराजे नाईक निंबाळकर सभापती, विधानपरिषद महाराष्ट्र राज्य, मा. खा. श्री. विजयसिंह मोहिते पाटील, मा. श्री. राजेंद्र पवार, अध्यक्ष, बारामती ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, मा. श्री. रणजित पवार, अध्यक्ष, बारामती सहकारी औद्योगिक वसाहत, यांचे बँकेच्या प्रगतीसाठी सदैव मार्गदर्शन लाभलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी व ऋणी आहे.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. रमेशआप्पा थोरात व उपाध्यक्ष मा. ॲड. श्री. संजय काळे, इंदापुरचे आमदार मा. श्री. दत्तात्रय भरणे, मा. श्री. दशरथ माने माजी सभापती कृषी व पशु संवर्धन जिल्हा परिषद पुणे, मा. श्री. मदनराव जगताप अध्यक्ष गौरीशंकर एज्यु. ट्रस्ट सातारा, मा. श्री. पुरूषोत्तम (दादा) जगताप अध्यक्ष सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, मा. श्री. अमरसिंह घोलप अध्यक्ष श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना, मा. श्री. रंजनकुमार तावरे अध्यक्ष दि. माळेगाव सहकारी साखर कारखाना, मा. श्री. बाळासाहेब तावरे माजी अध्यक्ष दि. माळेगाव सहकारी साखर कारखाना तसेच बारामती नगर परिषदेचे अध्यक्ष मा. श्री. सुभाष सोमाणी तसेच माजी अध्यक्ष सर्वश्री मा. श्री. सदाशिव (बापू) सातव, मा. श्री. जवाहरशेठ वाघोलीकर, मा. श्री. इम्तियाज शिकीलकर, मा. सौ. जयश्रीताई सातव तसेच अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. शांतीशेठ सराफ इत्यादींनी बँकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

बारामती, इंदापूर, दौंड, करमाळा, बार्शी, सातारा, संगमनेर व इतर सर्व शाखा क्षेत्रातील नगर परिषदांचे अध्यक्ष, पुणे, पिंपरी चिंचवड व सोलापूर महानगरपालिकांचे महापौर, उपमहापौर व बारामती तालुका दूध उत्पादक संघ, बारामती तालुका खरेदी विक्री संघ, बारामती तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती तालुका पंचायत समिती, जिल्हा परिषद पुणे, श्री. काशिविश्वेश्वर विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मर्या., बिल्डर्स असो. बारामती, बारामती स्विमर्स क्लब, व्यापारी महासंघ बारामती, बारामती मर्चंटस् असो., तसेच बँकेच्या शाखांच्या कार्यक्षेत्रातील विविध सहकारी संस्था, पतसंस्था सर्व संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी,

सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांनी बँकेच्या विकासामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या बँकेस सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

आगामी वर्षात आपणा सर्वांचे असचे सहकार्य व मार्गदर्शन बँकेस मिळेल व प्रगतीचा पुढचा टप्पा गाठण्यास आपणा सर्वांची सक्रीय मदत होईल यात शंका नाही.

भारतीय रिझर्व बँकेचे रिजनल ऑफिस मुंबई येथील सर्व अधिकारी, सहकार आयुक्त व निबंधक श्री चंद्रकांत दळवी साहेब, अप्पर निबंधक सह. संस्था श्री सुनिल पवार साहेब, विभागीय सहनिबंधक मा. डॉ. श्री. केदारी जाधवसाहेब, मा. श्री. धनंजय डोईफोडे साहेब, सहनिबंधक (नागरी बँका) पुणे, मा. श्री. दिनेश ओउळकर माजी प्र. सहकार आयुक्त व निबंधक, मा. श्री. ए. पी. काकडे साहेब जिल्हा उपनिबंधक पुणे ग्रामीण, मा. श्री. एस.एस. कुंभार साहेब व मा. सौ. एस. व्ही. कडू मॅडम सहाय्यक निबंधक पुणे, मा. श्री. देवीदास मिसाळ साहेब सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, बारामती तालुका, मा. श्री. एस. पी. चव्हाण साहेब विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था, बारामती यांनी व त्यांच्या खात्यातील सर्व अधिकारी, तसेच सन २०१४-१५ सालचे शासकीय लेखापरिक्षक संगिता एस. अगरवाल ॲण्ड असोसिएटस्, पुणे अंतर्गत लेखापरिक्षक मे. गुंड गावडे आणि कंपनी, मे. एस. पी. लड्डा ॲण्ड असो., पुणे, कर सल्लागार, मे. एम.डी. बलदोटा आणि कं. चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांनी बँकेस वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक्स् फेडरेशन लि. मुंबई, दि पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असो., पुणे, बँकेचे सर्व सभासद, हितचिंतक व ग्राहक यांनी वेळोवेळी सहकार्य करून बँकेच्या विकासास हातभार लावल्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे. वर्तमानपत्रे, साप्ताहिके यांचे सर्व संपादक व वार्ताहर मित्रांनी बँकेच्या कामकाजाला वेळोवेळी दिलेल्या प्रसिध्दी बद्दल मी त्यांचा आभारी आहे. अनेक ज्ञात अज्ञात थोर व्यक्ति व संस्थांनी वेळोवेळी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष केलेल्या सहकार्याबद्दल मी त्या सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

जयहिंद ! जय महाराष्ट्र !

दिनांक : २१ जुलै २०१५

आपला

श्रीकांत सिकची
अध्यक्ष,

**दि बारामती सहकारी बँक मर्यादित**

# लेखापरीक्षकांचा अहवाल

(बँकींग रेग्युलेशन ॲक्ट सन १९४९ कलम ३१ नुसार आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ८१ (५-ब) तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ खालिल नियम ६९ अन्वये)

दि बारामती सहकारी बँक मर्यादित, बारामती या बँकेचा दिनांक ३१ मार्च २०१५ अखेरचा ताळेबंद, नफातोटा पत्रक व हिशोबाबाबत या बँकेचे सरकारी लेखापरीक्षक म्हणून आम्ही अहवाल सादर करीत आहोत.

बँकेच्या शाखाधिकारी यांनी सादर व प्रमाणित केलेल्या व मुख्य कार्यालयाने हिशोबात अंतर्भूत केलेल्या हिशोबी पत्रकासह, दि बारामती सहकारी बँकेचा दिनांक ३१ मार्च २०१५ रोजीचा ताळेबंद व त्या तारखेस संपणाऱ्या नफा-तोटा पत्रकाचे आम्ही लेखापरीक्षण केले आहे.

लेखापरीक्षण वृत्तांतातील आमचे शेरे व सूचनांसह पात्र राहून आम्ही निवेदन देतो की,

१. बँकेच्या हिशोबी पुस्तकावरून तसेच आम्हास दिलेल्या माहितीवरून व केलेल्या खुलाशावरून बँकेने तयार केलेला ताळेबंद पूर्ण व वस्तुनिष्ठ असून त्यात आवश्यक त्या सर्व बाबी समाविष्ठ आहेत. तो बँकेच्या आर्थिक बाबींचे खरे व वास्तव स्वरूप दर्शवितो.

२. (याकामी) आम्ही ज्यावेळी काही स्पष्टीकरण किंवा माहिती विचारली ते स्पष्टीकरण अगर माहिती बँकेने आम्हांस दिली व अशी माहिती समाधानकारक दिसून आली.

३. आमच्या लेखापरीक्षणात दिसून आलेले बँकेचे व्यवहार, बँकेच्या अखत्यारीतील आहेत.

४. बँकेच्या शाखांकडून मिळालेली नैमित्तिक पत्रके लेखापरिक्षणाचे कामी पुरेशी असल्याचे दिसून आले.

५. वरील हिशोबी वर्षाअखेरचे नफा-तोटा पत्रक हे खरे व वस्तुनिष्ठ असून नफ्याचे वास्तव चित्र दर्शविते.

६. आमच्या मते, सदरचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे कायद्यातील तरतुदीस पात्र राहून केलेले आहे आणि

७. आमच्या मते, बँकेने कायद्यास अनुसरून हिशेबी पुस्तके ठेवलेली आहेत.

८. सन २०१४-१५ या वर्षासाठी बँकेस लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यात आला आहे.

स्वाक्षरी /-

दिनांक : २७ जून २०१५ — संगिता एस. अगरवाल ॲण्ड असोसिएटस् करिता

स्थळ : पुणे — चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे

## दिनांक ३१ मार्च २०१५

| दि. ३१ मार्च २०१४<br>₹ पैसे | भांडवल व देणी | रक्कम (₹)<br>₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१५<br>₹ पैसे |
|---|---|---|---|
| | **भाग भांडवल** | | |
| **४०,००,००,०००.००** | अधिकृत भागभांडवल | | **४०,००,००,०००.००** |
| **१८,६७,४५,२२०.००** | **वसुल भागभांडवल** | | **२१,०३,२१,६८०.००** |
| | भाग प्रत्येकी ₹ २०/– चे | | |
| **४९,३२,२४,६९२.२९** | **गंगाजळी व इतर निधी** | | **५७,७२,२८,६७९.२९** |
| ८,८७,८५,५५४.६६ | गंगाजळी निधी | १२,३२,७४,३८९.६६ | |
| १०,३१,४४,७८०.८० | इमारत निधी | १३,६६,४४,७८०.८० | |
| १९,८४,०१,०००.०० | एन.पी.ए. निधी | २१,१९,०१,०००.०० | |
| ८८,००,०००.०० | एन.पी.ए. निधी (गृहकर्ज व शेती कर्ज) | १,०३,००,०००.०० | |
| १,४९,८६,७४७.०० | थकव्याज निधी | १,४९,८६,७४७.०० | |
| २,४५,००,०००.०० | सक्षम मालमत्तेसाठी तरतूद | २,६०,००,०००.०० | |
| ५५,७३२.०० | कर्मचारी कल्याण निधी | ५५,७३२.०० | |
| ४,५६,८३५.६९ | आकस्मित खर्च निधी | ३,५६,८३५.६९ | |
| १०,०१,१२०.७८ | शाखा विस्तार निधी | १६,०१,१२०.७८ | |
| ३०,४०,६०२.९५ | लाभांष समिकरण निधी | ३५,४०,६०२.९५ | |
| २७,१९८.०० | सुवर्ण महोत्सव निधी | २७,१९८.०० | |
| १,००,०००.०० | बँक पुरस्कार निधी | १,००,०००.०० | |
| ३,५५,८२१.०० | धर्मदाय निधी | ५,५५,८२१.०० | |
| ३२,२१,४२०.०० | सभासद कल्याण निधी | ३६,३३,१७०.०० | |
| १,६०,३१,०००.४१ | गुंतवणूक घसारा निधी | ६४,३४,४०२.४१ | |
| ७५,००,०००.०० | गुंतवणूक चढ उतार निधी | १,५०,००,०००.०० | |
| २,२८,१६,८७९.०० | मालमत्ता पुनर्मुल्यांकन निधी | २,२८,१६,८७९.०० | |
| **९,२१,६५,६४,५१४.७७** | **ठेवी** | | **१०,३५,११,५६,६६४.२३** |
| ७,४९,४६,३१,४६६.२५ | मुदत ठेवी | ८,६०,१३,९९,९१७.०२ | |
| ६,५५,८२,८४०.०० | आवर्तक ठेवी | ८,०२,५२,५७५.०० | |
| १,१६,२१,८१,८८४.२५ | सेव्हींग्ज् ठेवी | १,११,८८,४१,८५०.८६ | |
| १३,१०,६२,६७६.०० | अल्प बचत ठेवी | १३,३५,५०,४०६.०० | |
| ३६,३१,०५,६४८.२७ | चालू ठेवी | ४१,७१,११,९१५.३५ | |
| **९,८९,६५,३४,४२७.०६** | **बेरीज पुढील पानावर** | | **११,१३,८७,०७,०२३.५२** |

## अखेरचा ताळेबंद

| दि. ३१ मार्च २०१४ ₹ पैसे | जिंदगी व येणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१५ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| **१९,४३,५२,८८४.१०** | **हातातील रोख शिल्लक** | | **२०,९०,६२,४०९.२०** |
| **३२,०४,७४,०१३.२४** | **इतर बँकांतील शिल्लक** | | **६८,८५,१०,३६५.१८** |
| **३,३१,५६,७७,४२७.५२** | **गुंतवणूक** | | **३,४२,६५,९६,३६४.८२** |
| **५,८९,५९,०३,६४५.२९** | **कर्जे** | | **६,६०,५१,३३,१०६.५५** |
| | **१. अल्पमुदतीची कर्जे** | | |
| ३,३४,२९,०१,६९६.०९ | अ) सुरक्षित कर्जे | ३,६६,२७,३०,५९८.२१ | |
| | पैकी थकबाकी ₹ १४,५७,३८,९४८.८७ | | |
| २,१४,२०,७८,९७२.७० | **२. मध्यम मुदतीची कर्जे** | २,५३,७६,३३,८९६.०९ | |
| | अ) सुरक्षित ₹ २,४५,३२,००,५०७.४१ | | |
| | पैकी थकबाकी ₹ ७,५८,९१,२८०.६७ | | |
| | ब) असुरक्षित ₹ ८,४४,३३,३८८.६७ | | |
| | पैकी थकबाकी ₹ ९३,९१,५८२.०९ | | |
| | **३. दिर्घ मुदतीची कर्जे** | | |
| ४१,०९,२२,९७६.५० | अ) सुरक्षित | ४०,४७,६८,६१२.२५ | |
| | पैकी थकबाकी ₹ १,७३,३१,१९३.१७ | | |
| **९,७२,६४,०७,९७०.१५** | **बेरीज पुढील पानावर** | | **१०,९२,९३,०२,२४५.७५** |

## दिनांक ३१ मार्च २०१५

| दि. ३१ मार्च २०१४ ₹ पैसे | भांडवल व देणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१५ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| **९८९,६५,३४,४२७.०६** | **बेरीज मागील पानावरून** | | **११,१३,८७,०७,०२३.५२** |
| | | | |
| **३६,४४,६८७.००** | **वसुलीसाठी आलेली बिले** | | **२०,७९,८१५.००** |
| **६३६,८३,१९३.०९** | **थकव्याज येणे** | | **५८१,८३,२६२.९३** |
| **१७,४८,९५२.४४** | **शाखा जुळवणी** | | **९५,२१,१४५.२०** |
| **४८९,८४,३२९.६१** | **इतर देणी** | | **४१,४१६,७०८.६२** |
| १३,७५,२०८.०० | डिव्हीडंड देणे | १८,६५,३५७.०० | |
| ७२,२८,५३७.०० | व्याज देणे | ८९,९७,०२३.०० | |
| १९,३९,२४९.०० | ऑडीट फी देणे | २२,१५,९५५.०० | |
| २,५५,०००.०० | शिक्षण फी देणे | ५,०५,०००.०० | |
| ३,२७,९७,९१४.७६ | पेस्लीप / डी.डी. पेअबल | ११६,३२,९७४.४४ | |
| ४१,०५,४२०.८५ | इतर देणी | ९१,३४,६८३.०० | |
| १२,८३,०००.०० | एन.एफ.एस. खाते | ७०,६५,७१६.१८ | |
| **९,१०,६५,३५६.४५** | **नफा** | | **९२५,०३,२५३.५४** |
| २७,३६७.३९ | मागील वर्षाचा शिल्लक | १५,३५६.४५ | |
| ९१०,३७,९८९.०६ | चालू वर्षाचा | ९२४,८७,८९७.०९ | |
| | | | |
| **१०,१०,५६,६०,९४५.६५** | **एकूण बेरीज** | | **११,३४,२४,११,२०८.८१** |

तपासले आमचे याच तारखेच्या अहवालानुसार बरोबर आहे.

**संगिता एस. अगरवाल ॲण्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंटस् (पुणे)

श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष

अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष

दिग्विजय पोपटराव तुपे
संचालक

सुभाष रामचंद्र जांभळकर
संचालक

कपिल राजेंद्र बोरावके
संचालक

डॉ. वंदना उमेश पोतेकर
संचालिका

## अखेरचा ताळेबंद

| दि. ३१ मार्च २०१४ ₹ पैसे | जिंदगी व येणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१५ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| **९७२,६४,०७,९७०.१५** | **बेरीज मागील पानावरून** | | **१०,९२,९३,०२,२४५.७५** |
| | | | |
| **३६,४४,६८७.००** | **वसुलीसाठी पाठविलेली बिले** | | **२०,७९,८१५.००** |
| **६३६,८३,१९३.०९** | **थकव्याज येणे** | | **५८१,८३,२६२.९३** |
| | | | |
| **३१,१९,२५,०९५.४१** | **इतर मालमत्ता** | | **३५,२८,४५,८८५.१३** |
| ११,५३,६८,५६९.७० | डेड स्टॉक व फर्निचर | १३,७४,९९,६३४.८१ | |
| ४,८९,५६०.०० | डिपॉझिटस् | ५४,३८,११२.०० | |
| १३,२०,३३,८३१.३५ | जागा व इमारती | १५,७८,१३,९६५.३५ | |
| १८,३५,३५२.४३ | शिल्लक छपाई माल | २०,६१,७५८.९९ | |
| ८४,५१,६१०.०८ | इतर येणी | ६९,४७,७४०.२८ | |
| ५,३७,४६,१७१.८५ | व्याज येणे (गुंतवणुक) | ४३०,८४,६७३.७० | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| **१०,१०,५६,६०,९४५.६५** | **एकूण बेरीज** | | **११,३४,२४,११,२०८.८१** |

रमणिक रामजी मोता
संचालक

सचिन सदाशिव सातव
संचालक

ॲड. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी
संचालक

देवेंद्र रामचंद्र शिर्के
संचालक

आदेश अनिलकुमार वडुजकर
संचालक

उध्दव सोपानराव गावडे
संचालक

सुरेश गुलाबराव देवकाते
संचालक

विजयराव प्रभाकर गालिंदे
संचालक

सौ. कल्पना प्रदिप शिंदे
संचालिका

प्रितम सुर्यकांत पहाडे
तज्ञ संचालक (सी.ए.)

श्रीनिवास गोपाळराव बहुळकर
कार्यकारी संचालक

## दिनांक ३१ मार्च २०१५ अखेरचे

| दि. ३१ मार्च २०१४ ₹ पैसे | खर्च | दि. ३१ मार्च २०१५ ₹ पैसे |
|---|---|---|
| ९६,९७,०६,१९३.७३ | ठेवीवरील व्याज | १२०,३८,७१,९३८.०४ |
| ११९,७६,१५५.०० | कर्जावरील व्याज | १,२४,२२९.०० |
| ९७,२०४,८०८.७९ | कर्मचारी वर्ग वेतन व निधी | ११,३७,२५,१५०.४८ |
| ७८,८४,९५८.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | ९०,२२,०३०.०० |
| ४,७५,२३१.५२ | संचालक मंडळ प्रवास खर्च | ३,६४,५२१.३४ |
| ५८७,७०५.३७ | कर्मचारी वर्ग प्रवास खर्च | ६,६५,६९८.१८ |
| २७,९५,३४०.०० | विज खर्च | ३५,८६,६६९.६० |
| ९८,६२,०५२.०० | जागा भाडे व नगरपरिषद कर | ११६,४१,८८७.३० |
| ११,५८,०१६.७० | पोस्टेज व टेलीफोन | १३,६१,९०६.२० |
| १८,३८,१३१.०७ | छपाई व लेखन साहित्य | २०,०६,९२७.४४ |
| १९,६०,०००.०० | सरकारी व स्थानिक लेखापरीक्षण शुल्क | २३,१०,०००.०० |
| ९९,२८,६५१.२७ | सर्वसाधारण खर्च | ८९,३०,२६६.६९ |
| ६,३०,९१९.८१ | समाशोधन शुल्क | ५,८४,९७३.३० |
| ११६,९६,४९७.७६ | घसारा | १३६,७६,४३१.८९ |
| ११,५०,०००.०० | ग्रुप ग्रॅच्युइटी खर्च | १२,५०,०००.०० |
| १०२,४९,४९०.०० | विमा खर्च | १२७,९२,४०३.०० |
| १०,१६,०७७.०० | वृत्तपत्र जाहिरात खर्च | १५,१६,२१९.०० |
| २,२७,३५२.०० | वर्गणी व देणगी | १,९१,९०१.०० |
| २८५,७१,५४८.०० | आयकर | ३७१,५१,७४२.५८ |
| ३४,६९,३५६.२० | इतर खर्च | ५७,९८,५६९.३१ |
| ४,४७,९४३.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ४,०६,७२४.०० |
| | **तरतूदी :** | |
| १७५,००,०००.०० | एन.पी.ए. तरतूद | १३५,००,०००.०० |
| १५,००,०००.०० | एन.पी.ए. तरतूद (गृहकर्ज व शेती कर्ज ) | १५,००,०००.०० |
| २५,००,०००.०० | सक्षम मालमत्ता तरतूद | १५,००,०००.०० |
| १७५,००,०००.०० | रोखे गुंतवणूक घसारा निधी तरतूद | ७५,००,०००.०० |
| ८५,००,०००.०० | रोखे प्रिमियम ॲमॉरटायजेशन | ६,४८,३५०.०० |
| ३०,०००.०० | शिक्षण निधी | - |
| ९१०,३७,९८९.०६ | नफा | ९२४,८७,८९७.०९ |
| **१३१,१४,०४,४१६.२८** | **एकूण बेरीज** | **१५४,८१,१६,४३५.४४** |

तपासले आमचे याच तारखेच्या अहवालानुसार बरोबर आहे.

**संगिता एस. अगरवाल ॲण्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंटस् (पुणे)

श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष

अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष

दिग्विजय पोपटराव तुपे
संचालक

सुभाष रामचंद्र जांभळकर
संचालक

# नफातोटा पत्रक

| दि. ३१ मार्च २०१४<br>₹ पैसे | उत्पन्न | दि. ३१ मार्च २०१५<br>₹ पैसे |
|---|---|---|
| १०,०९,४२१,९६१.८६ | **कर्जावरील व्याज** | १२३,३९,४३,९७९.५४ |
| | | |
| २८,४६,५०,४१७.९२ | गुंतवणुकीवरील व्याज | २९,५४,१६,१४४.७२ |
| | | |
| ३,३२,६९०.०० | शेअर्स वरील लाभांष | ३,८०,०००.५० |
| | | |
| ५१,८८,१९३.७५ | कमिशन व वटाव | ४३,५८,२०९.४० |
| | | |
| | **इतर उत्पन्न :** | |
| | | |
| ११८,११,१५२.७५ | फॉर्म फी, लॉकर भाडे व किरकोळ उत्पन्न | १४०,ि१८,१०१.२८ |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| १३१,१४,०४,४१६.२८ | **एकूण बेरीज** | १५४,८१,१६,४३५.४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| रमणिक रामजी मोता<br>संचालक | सचिन सदाशिव सातव<br>संचालक | ॲड. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी<br>संचालक | देवेंद्र रामचंद्र शिर्के<br>संचालक |
| आदेश अनिलकुमार वडुजकर<br>संचालक | उध्दव सोपानराव गावडे<br>संचालक | सुरेश गुलाबराव देवकाते<br>संचालक | विजयराव प्रभाकर गालिंदे<br>संचालक |
| कपिल राजेंद्र बोरावके<br>संचालक | डॉ. वंदना उमेश पोतेकर<br>संचालिका | सौ. कल्पना प्रदिप शिंदे<br>संचालिका | प्रितम सुर्यकांत पहाडे<br>तज्ञ संचालक (सी.ए.) |

श्रीनिवास गोपाळराव बहुळकर
कार्यकारी संचालक

## सन २०१४-१५ या वर्षात झालेल्या प्रत्यक्ष उत्पन्न व खर्चाची माहिती

### खर्च

(रक्कम ₹ कोटीमध्ये)

| अनु. | खर्चाचा तपशिल | अंदाज केलेला खर्च | प्रत्यक्ष झालेला खर्च | कमी अगर जास्त |
|---|---|---|---|---|
| १ | ठेवीवरील व्याज | १२०.०० | १२०.३९ | +०.३९ |
| २ | कर्जावरील व्याज | १.५० | ०.०१ | -१.४९ |
| ३ | सेवक वर्ग वेतन व भत्ते | ११.०० | ११.३७ | +०.३७ |
| ४ | सेवक वर्ग भविष्य निर्वाह निधी व ग्रुप ग्रॅच्युइटी अंशदान | १.२५ | १.०३ | -०.२२ |
| ५ | सं.मं. प्रवास खर्च व सभा भत्ता | ०.०८ | ०.०८ | - |
| ६ | सेवक वर्ग प्रवास खर्च | ०.१० | ०.०७ | -०.०३ |
| ७ | जागा भाडे व स्थानिक कर | १.३० | १.१६ | -०.१४ |
| ८ | टपाल,तार व दूरध्वनी व वीज खर्च | ०.४७ | ०.५० | +०.०३ |
| ९ | छपाई व लेखन साहीत्य | ०.३० | ०.२० | -०.१० |
| १० | हिशेब तपासणी फी | ०.३० | ०.२३ | -०.०७ |
| ११ | अनुत्पादक मालमत्ता (एन.पी.ए.) साठी तरतूद | २.५० | १.६५ | -०.८५ |
| १२ | समाशोधन/ विमा, शिक्षण फंड, वर्गणी व देणगी | १.५० | १.३६ | -०.१४ |
| १३ | वृत्तपत्र जाहीरात | ०.१५ | ०.१५ | - |
| १४ | घसारा | १.७५ | १.३७ | -०.३८ |
| १५ | सर्व साधारण/वार्षिक सभा व इतर खर्च | १.५० | १.४६ | -०.०४ |
| १६ | गुंतवणूक रोखे घसारा निधी तरतूद व आयकर | ७.०० | ४.५३ | -२.४७ |
| १७ | नफा | १०.५० | ९.२५ | -१.२५ |
| | **एकूण** | **१६१.२०** | **१५४.८१** | **-६.३९** |

### उत्पन्न

| अनु. | उत्पन्नाचा तपशिल | अंदाज केलेले उत्पन्न | प्रत्यक्षात झालेले उत्पन्न | कमी अगर जास्त |
|---|---|---|---|---|
| १ | कर्जावरील व्याज | १२७.५० | १२३.३९ | -४.११ |
| २ | गुंतवणुकीवरील व्याज | ३१.७५ | २९.५४ | -२.२१ |
| ३ | कमीशन व वटाव | ०.६० | ०.४४ | -०.१६ |
| ४ | इतर उत्पन्न | १.३५ | १.४४ | +०.०९ |
| | **एकूण** | **१६१.२०** | **१५४.८१** | **-६.३९** |

## अहवालासोबत सादर करावयाची सांख्यिकिय माहिती

(रक्कम ₹ लाखात)

| अनु. | तपशिल | ३१/०३/२०१४ | ३१/०३/२०१५ |
|---|---|---|---|
| १ | भांडवल पर्याप्तता प्रमाण | | |
| | अ) भांडवल निधी प्रकार - १ | १२.०२ | १२.१५ |
| | ब) भांडवल निधी प्रकार - २ | १.१२ | १.१३ |
| | एकूण | १३.१४ | १३.२८ |
| २ | भांडवली पर्याप्ततेची वाटचाल | | |
| | अ) भांडवल निधी प्रकार - १ | ४५५५.१६ | ५५२५.९५ |
| | ब) भांडवल निधी प्रकार - २ | ४२२.६७ | ५१२.६७ |
| | एकूण | ४९७७.८३ | ६०३८.६२ |
| | क) जोखिम संपत्तीच्या भाराचे गणन | ३७८७६.५२ | ४५४७८.४६ |
| ३ | गुंतवणूक | | |
| | १) पुस्तकी मूल्य | ३०२९७.३४ | ३१३०७.५४ |
| | २) मूळ किंमत | ३००३२.३० | ३१०१२.७८ |
| | ३) बाजार मूल्य | ३०१४६.५६ | ३१२९४.२४ |
| ४ | कर्ज | | |
| | अ) स्थावर मालमत्ता | ३८४८.१४ | ३६३३.८० |
| | ब) बांधकाम | ४५६८.३७ | ९२१६.०० |
| | क) गृहतारण | ३०५३.५५ | ४०४७.६९ |
| | एकूण | ११४७०.०६ | १६८९७.४९ |
| ५ | शेअर्स आणि डिबेंचर्सवर कर्जे | नाही | नाही |
| ६ | संचालक व त्यांचे नातेवाईक, कंपनी, संस्था व | | |
| | ते सहभागी संस्थेस कर्ज वाटप | | |
| | १) संचालक व त्यांचे नातेवाईक | १५.९६ | १५.९६ |
| | २) थकबाकी | १५.९६ | १५.९६ |
| ७ | ठेवींचा सरासरी परिव्यय | ११.७८% | ९.६२% |

# अहवालासोबत सादर करावयाची सांख्यकिय माहिती

(रक्कम ₹ लाखात )

| अनु. | तपशिल | | ३१/०३/२०१४ | ३१/०३/२०१५ |
|---|---|---|---|---|
| ८ | अनुत्पादित मालमत्ता (एन.पी.ए.) | | | |
| | अ) सकळ थकबाकी | टक्केवारी | ४.२२% | ४.३६% |
| | | रक्कम | २४८५.२७ | २८८१.३२ |
| | ब) निव्वळ थकबाकी | टक्केवारी | ०.४६% | ०.८०% |
| | | रक्कम | २६३.३९ | ५०९.४४ |
| ९ | लाभदायकता/नफा क्षमता | | | |
| | अ)खेळत्या भांडवलाशी व्याजापासून मिळालेल्या | | ११.७०% | १३.५५% |
| | उत्पन्नाची टक्केवारी | | | |
| | ब) खेळत्या भांडवलाशी इतर उत्पन्नाची टक्केवारी | | ०.१७% | १.२८% |
| | क) खेळत्या भांडवलाशी ढोबळ नफ्याची टक्केवारी | | १.६६% | १.३५% |
| | ड) जिंदगीवरील परतावा | | १५.४८% | १५.६१% |
| | इ) निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी टक्केवारी | | ०.९१% | ०.८२% |
| | फ) प्रति कर्मचारी व्यवसाय | | ७१२.८५ | ८९७.१६ |
| १० | चालू वर्षात थकीत कर्जासाठी केलेली तरतूद | | २१५.०० | १६५.०० |
| ११ | गुंतवणुकीवरील घसाऱ्यासाठी केलेली तरतूद | | २६०.०० | ८१.४८ |
| १२ | अनुत्पादक मालमत्तेतील बदल | | | |
| | आरंभीची शिल्लक | | २४१८.५९ | २४८५.२७ |
| | (-) वसुली | | ५०३.०५ | ५३०.५५ |
| | (+) नविन थकबाकी | | ५६९.७३ | ९२६.६५ |
| | सकळ थकबाकी | | २४८५.२७ | २८८१.३७ |
| | (-) तरतूद | | २२२१.८८ | २३७१.८८ |
| | निव्वळ थकबाकी | | २६३.३९ | ५०९.४९ |
| १३ | तरतूदी | | | |
| | सक्षम मालमत्ता | | २४५.०० | १६५.०० |
| | थकबाकी | | - | - |
| | गुंतवणुक चढ उतार निधी | | ७५.०० | १५०.०० |
| १४ | विदेशी चलन संपत्ती व देयता | | नाही | नाही |
| १५ | मुदत ठेवीसाठी भरलेल्या विम्याची रक्कम (**DICGC**) | | ४६.९८ | ५८.३२ |

# सन २०१५-२०१६ सालाचे अंदाजपत्रक

## खर्च

(रक्कम ₹ कोटीमध्ये)

| अनु. | खर्चाचा तपशिल | अनुमानित खर्च |
|---|---|---|
| १ | ठेवीवरील व्याज | १४५.०० |
| २ | कर्जावरील व्याज | ०.५० |
| ३ | सेवक वर्ग वेतन व भत्ते | १२.५० |
| ४ | सेवकवर्ग भविष्य निर्वाह निधी व ग्रुप ग्रॅच्युईटी अंशदान | १.५० |
| ५ | सं.म. प्रवास खर्च व सभा भत्ता | ०.१५ |
| ६ | सेवक वर्ग प्रवास खर्च | ०.१५ |
| ७ | जागा भाडे व स्थानिक कर | १.५० |
| ८ | टपाल, तार व दूरध्वनी खर्च व विजखर्च | ०.५० |
| ९ | छपाई व लेखन सामुग्री खर्च | ०.४० |
| १० | हिशेब तपासणी फी | ०.३५ |
| ११ | अनुत्पादक मालमत्ता(एनपीए) साठी तरतूद | २.०० |
| १२ | समाशोधन ,विमा,शिक्षण फंड,वर्गणी व देणगी | २.०० |
| १३ | वृत्तपत्र जाहिरात | ०.२० |
| १४ | घसारा | १.७५ |
| १५ | सर्व साधारण खर्च व इतर खर्च | १.७५ |
| १६ | गुंतवणूक, रोखे घसारा निधी व आयकर | ७.०० |
| १७ | नफा | १०.०० |
| | **एकूण** | **१८७.२५** |

## उत्पन्न

| अ.क्र. | उत्पन्नाचा तपशिल | अंदाजे उत्पन्न |
|---|---|---|
| १ | कर्जावरील व्याज | १५०.०० |
| २ | गुंतवणुकीवरील व्याज | ३५.०० |
| ३ | कमीशन व वटाव | ०.५० |
| ४ | इतर उत्पन्न | १.७५ |
| | **एकूण** | **१८७.२५** |

# परिशिष्ट अ

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नांव | **दि बारामती सहकारी बँक मर्यादित** | |
| मुख्य कार्यालयाचा पत्ता | भिगवण रोड, बारामती, जि. पुणे पिन - ४१३ १०२ | |
| नोंदणीचा दिनांक व क्रमांक | दि. २३/०९/१९६१ (रजि.नं. ३१२४६) | |
| रिझर्व्ह बँकेच्या परवान्याचा क्रमांक व दिनांक | डी.बी.ओ.डी./यु.बी.डी./एम.एच.४९८ पी - दिनांक १८ ऑगस्ट १९८६ | |
| | | |
| दिनांक ३१ मार्च २०१५ अखेर | | (रक्कम ₹ कोटीमध्ये) |
| कार्यक्षेत्र | पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक, रायगड व अहमदनगर जिल्हे | |
| शाखांची संख्या (मुख्य कार्यालयासह) | २४ | |
| सभासद | नियमित | १४३०५ |
| | नाममात्र | २६१२ |
| वसुल भागभांडवल | | २१.०३ |
| राखीव व इतर निधी | | ५७.७२ |
| ठेवी | बचत ठेवी | १११.८८ |
| | चालु ठेवी | ४१.७१ |
| | मुदत व इतर ठेवी | ८८१.५३ |
| दिलेली कर्जे | सुरक्षित | ६५२.०७ |
| | असुरक्षित | ८.४४ |
| एकूण कर्जापैकी अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रास | अग्रक्रम क्षेत्रासाठी | ६२.२९% |
| झालेल्या कर्जवाटपाची टक्केवारी | त्यापैकी दुर्बल घटकासाठी | २६.६३% |
| गुंतवणूक | महाराष्ट्र राज्य सह.बँक लि.व इतर ठेवी | २९.१५ |
| | म.रा.सह.बँक/पुणे जि.म.सह.बँक शेअर्स | ०.४३ |
| | सरकारी रोखे व इतर | ३१३.०८ |
| नेट एन. पी. ए. | | ०.८०% |
| शासकिय लेखापरिक्षण वर्ग सन २०१४-१५ | | 'अ' |
| एकूण कायम सेवक वर्ग | | २३० |
| नफा | | ९.२५ |
| खेळते भागभांडवल | | ११२८.२१ |


ठेवी व कर्जावरील व्याज ७८ पैसे
तरतुदी २ पैसे
नफा ६ पैसे
प्रशासकीय खर्च ८ पैसे
व्यवस्थापकीय खर्च ४ पैसे
आयकर २ पैसे
रुपया असा खर्च झाला


कर्जावरील मिळालेले व्याज ७९.७१ पैसे
गुंतवणूकीवरील व्याज १९.०८ पैसे
इतर उत्पन्न ०.९३ पैसे
कमिशन व वटाव ०.२८ पैसे
उत्पन्नाचा रुपया असा आला

## ❊ सभासद व खातेदारांना विनंती ❊

- कर्ज फेडीची मुदत लक्षात ठेवा व वेळेवर कर्जहप्ते भरून बँकेस सहकार्य करा.
- बँकेने दिलेले पासबुक प्रत्येक व्यवहारानंतर ते भरले आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. त्यातील नोंदी बँकेच्या सेवकाच्या स्वाक्षरीने प्रमाणित करून घ्याव्यात.
- सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास तो कृपया ताबडतोब बँकेस कळवावा.
- कॅश-क्रेडिट खातेदारांनी दरमहा दिनांक ७ तारखेपर्यंत बँकेस स्टॉक स्टेटमेंट आणून द्यावेत व शेकडा दोन टक्के जादा व्याज आकारणी टाळावी.
- कर्जास तारण असलेल्या स्थावर मिळकतीवर बँक कर्जाची नोंद करून द्यावी.
- कॅश-क्रेडिट कर्जाचे व कर्जासाठी तारण दिलेल्या मालाच्या विमा पॉलीसीचे वेळचेवेळी नुतनीकरण करावे.
- ₹ २०,०००/- पेक्षा जास्त रकमेची ठेव रोखीने परत घेता येणार नाही.
- ज्या सेव्हींग्ज् व चालू ठेव खातेदारांनी आपल्या पत्त्याबाबत पुरावा (Address Prof) व फोटो दाखल केले नसतील त्यांनी ते कृपया दाखल करावेत व बँकेकडून पासबुकावर फोटो लावून घ्यावेत. (के. वाय. सी. पूर्तता)
- बँकेचे सर्व सभासद व खातेदार यांचेसाठी एस.एम.एस (SMS) बँकींगची सुविधा सुरू आहे. तरी सभासदांनी आपले भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक फॉर्ममध्ये भरून बँकेच्या नजीकच्या शाखेत पाठविण्याचे करावे.
- केंद्र सरकारने चालु अर्थसंकल्पात जून २०१५ पासून सहकारी बँकाच्या सभासदांना ठेवींवर टी.डी.एस. लागु केलेला आहे. तरी सभासदांना विनंती करणेत येते की, ज्या सभासदांच्या ठेवींवरील व्याज ₹ १०,०००/- पेक्षा जास्त होत असेल त्यांनी नजीकच्या शाखेशी संपर्क साधून माहिती घ्यावी.

## ❊ बँकेची वैशिष्ठे ❊

- बँकेचे कार्यक्षत्र पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक, रायगड व अहमदनगर जिल्हे
- बँकेतील सर्व प्रकारच्या ठेवी (रू. १.०० लाखापर्यतच्या) ठेव विमा योजने अंतर्गत संरक्षित.
- कोअर बँकींग,एस.एम.एस.बँकींग,ई-टॅक्स पेमेंट,आर.टी.जी.एस.,नेफ्ट,ए.टी.एम., लॉकर्स इ. सुविधा उपलब्ध
- सर्व खातेदार व सभासदांसाठी नविन पॅन कार्ड काढण्याची, तसेच जनरल इन्शुरन्स व आर्युविमा इ. सुविधा उपलब्ध
- प्रधानमंत्री जिवन ज्योती, जिवन सुरक्षा विमा योजना.
- वीज बिल भरणा सुविधा.
- सर्व शाखा अत्याधुनिक बँकिंग सुविधा व सुबक फर्निचर सह सुसज्जीत.
- सुवर्ण आभुषणांचे तारणावर त्वरीत कर्ज उपलब्ध.
- देशातील सर्व शहरावरील ड्राफ्ट सुविधा.
- सभासदांना ₹ २.०० लाखापर्यंत अपघाती विम्याचे संरक्षण
- व्यापार, व्यवसाय व नोकरदार सभासदांसाठी विविध कर्ज योजना
- सी.टी.एस. २०१० चेक बुक सुविधा
- संपुर्ण भारतातील २,२०,००० पेक्षा जास्त ए.टी.एम. सेंटर्स व्दारे व्यवहार

# बँकेच्या कोथरुड शाखेच्या स्थलांतर सोहळ्याची क्षणचित्रे

रविवार, दिनांक १० ऑगस्ट २०१४









# बँकेच्या भोसरी व सांगवी (पुणे) शाखांच्या उद्घाटन सोहळ्याची क्षणचित्रे

शनिवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०१४

भोसरी शाखा








सांगवी शाखा








# बँकेच्या अहमदनगर शाखेचे उद्घाटन व इंदापुर शाखेच्या स्थलांतर सोहळ्याची क्षणचित्रे (शुक्रवार, दिनांक ०५ डिसेंबर २०१४)

अहमदनगर शाखा








इंदापुर शाखा










# बँकेची सांपत्तिक स्थिती

*रुपये लाखांत*


## वसुल भाग भांडवल





## ठेवी





## दिलेली कर्जे




## नफा



# विनम्र श्रध्दांजली



**भारताच्या क्षेपणास्त्र कार्यक्रमाचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ**
**माजी राष्ट्रपती भारतरत्न स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम**
**यांना भावपूर्ण श्रद्धांजली !**

तसेच अहवाल सालामध्ये भारतातील
जे ज्ञात, अज्ञात थोर नेते,
संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ,
लेखक, साहित्यिक, कलावंत, जवान,
शिक्षणतज्ञ, देशभक्त, कवी,
सामाजिक कार्यकर्ते,
बँकेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक
दिवंगत झाले...
त्यांना नम्रतापूर्वक भावपूर्ण श्रध्दांजली.
ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.



## बँकेच्या खातेदारांसाठी खालील सेवा व सुविधा शाखेमध्ये उपलब्ध



### विज बिल भरणा केंद्र

महावितरण विज कंपनीच्या बिलांचा भरणा करण्याची सुविधा शाखेमध्ये उपलब्ध आहे.

### विमा पॉलिसीची सेवा

जीवन विमा व जनरल इन्शुरन्स्‌ची पॉलिसी सुविधा. तसेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अनुक्रमे रू. ३३० व रू. १२ इतक्या अत्यल्प वार्षिक हप्त्याने शाखेत उपलब्ध




### पॅन कार्ड सेवा

इनकम टॅक्स्‌ करीता आवश्यक असलेले पॅन कार्ड काढणेसाठी शाखाधिकाऱ्यांना भेटा




### ऑनलाईन टॅक्स्‌ सुविधा

आयकर, व्हॅट, सर्व्हिस टॅक्स्‌ इ. करांचा भरणा करण्याची सुविधा उपलब्ध




### मुद्रांक शुल्क व नोंदणी फी चा भरणा

विविध करारनाम्यासाठी मुद्रांक (Stamp Fee) व रजिस्ट्रेशन फी (Registration Fee) चा भरणा करण्याची सुविधा शाखेत उपलब्ध



### आर.टी.जी.एस. व नेफ्ट सुविधा

भारतात कोठेही रक्कम पाठविण्याची व मागविण्याची तत्पर सेवा



### ए.टी.एम. कम डेबीट कार्ड सुविधा

सेव्हिंग्ज व चालू खाते धारकांसाठी एटीएम कम डेबीट कार्डची सुविधा भारतातील कोणत्याही बँकेच्या एटीएम सेंटर मधून पैसे काढण्याची व पॉज मशिनव्दारे व्यवहार करण्याची सुविधा




### एस.एम.एस. बँकींग सुविधा

आपल्या खात्यावरील व्यवहाराची माहिती क्षणार्धात मोबाईलवर मिळवा



### सोने तारण

सोने दागदागिन्यांच्या तारणावर कमी व्याजदराने त्वरीत कर्ज उपलब्ध

**एनी ब्रँच बँकींग / संपूर्ण भारतातील २,२०,००० पेक्षा जास्त ए.टी.एम. सेटर्स व्दारे व्यवहार**

# दि बारामती सहकारी बँक मर्यादित

**मुख्य कार्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२**